## जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन

## जिल्हा परिषद सातारा

## खाजगी वाहने मासिक भाडे तत्वावर घेणेसाठी जाहीर ई- निविदा सूचना-मुदतवाढ (व्दितीय मागणी )

| अ. क्र. | वाहनाचा प्रकार | आवश्यक वाहनांची संख्या | कमाल दर मर्यादा | निविदा शुल्क | बयाणा रक्कम / सुरक्षा ठेव) | ई निविदा कालावधी | ई निविदा उघडणेचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | इनोव्हा (वातानुकुलितसह) | १ | रु.१३/- प्रती कि.मी. | रु.१,०००/- ना परतावा | रु.५,०००/- | दि.२९/१२/२०१६ रोजी सकाळी ११.०० पासून दि.०४/०१/२०१७रोजी संध्या ५.०० वाजे पर्यंत | दि.०६/०१/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता अथवा कार्यालयीन सोईच्या दिवशी व वेळी |
| | | | | शासनाच्या http://mahatenders.gov.in चे संकेतस्थळावर Online Payment Mode पद्धतीने जमा करावी. | | | |

टिप :- वरील वाहनांचे प्रकार व संख्येमध्ये प्रत्यक्ष आवश्यकतेनुसार बदल होवू शकतो.

**ई-निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे**

**ए)** सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-टेंडरव्दारे ऑनलाईन पध्दतीने संगणकीय आज्ञावलीत केली जाईल. या ई-निविदे संदर्भात ई निविदा सूचना व इतर अनुषंगिक माहिती महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर तसेच सातारा जिल्हा परिषदेची वेबसाईट www.zpsatara.gov.in वर उपलब्ध आहे.

**बी)** वरील कामाची निविदा प्रपत्रे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. सदर निविदा प्रपत्रे संकेतस्थळावर दिनांक ०४/०१/२०१७ रोजी संध्या. ५.०० वाजेपर्यंत अपलोड करता येतील.

**सी )** पुरवठादाराने त्याचे दर संगणकीय आज्ञावलीत ऑनलाईन अपलोड करणे बरोबरच संबंधित कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करणे आवश्यक आहे.

१) निविदा शुल्क रु.१०००/-(रु.एक हजार फक्त - नापरतावा) व वाहन बयाणा रक्कम रु.५,०००/- (रु.पाच हजार फक्त) शासनाच्या http://mahatenders.gov.in चे संकेतस्थळावर Online Payment Mode पद्धतीने जमा करणेत यावी व त्यानुसार सदर निविदा शुल्क व बयाणा रक्कम भरलेचे संबंधित नमुन्यातील प्रमाणपत्र (As a part of e-tendering document and process ) युनिक ट्रान्झॅक्शन रजिस्ट्रेशन नंबर नोंदवून तांत्रिक लिफाफयासोबत अपलोड करणेत यावा.

२) वाहनाचे आर.सी.बुक व टी.सी. बुक

३) वाहनाची संपूर्ण विमा पॉलिसी

४) वाहन चालकाचा परवाना

५) वाहनाचे पी.यु.सी. प्रमाणपत्र. इ.सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती स्कॅन करुन अपलोड कराव्यात.

६) वाहन उत्पादक वर्ष २०१२ अथवा तद्नंतरचे असल्यास निविदाधारक निविदा भरणेस पात्र आहे.तसा पुरावा सोबत जोडावा.

७) वाहन परमिटचे असावे.

**डी**) निविदा धारकाने, निर्धारीत केलेल्या कमाल दर मर्यादेपेक्षा जादा दर देवू नयेत.

**इ**)वाहनाची मालकी/वाहन वापरण्याचा अधिकार सिध्द करु शकणाऱ्या वाहनधारकांनीच निविदा भरणे आवश्यक राहील.

**एफ**) निविदा स्वीकारणेचा किंवा कोणतेही कारण न दर्शविता संपूर्ण किंवा अंशतः निविदा नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांनी राखून ठेवलेला आहे.

**जी) भाडयाने वाहन पुरविणेबाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे.**

१. वाहन भाडयाने घेणबाबतचा कालावधी करारनामा झालेच्या तारखेपासून किमान ११ महिन्याचा अथवा ज्या प्रयोजनासाठी वाहन भाडयाने घ्यावयाचे आहे ते प्रयोजन संपणेचा दिनांक यापैकी जो कमी असेल तो कालावधी गृहीत धरणेत आलेला आहे. याबाबतचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांचेकडे राखून ठेवणेत आलेला आहे.

२. वाहन दरमहा किमान २000 कि.मी. अथवा आवश्यकतेनुसार जादाही वापरले जाईल व त्याप्रमाणे देयक अदा केले जाईल. वाहनाचा वापर २000 कि.मी.पेक्षा कमी झाला तरी त्यास २000 कि.मी. साठीचे देयक अदा केले जाईल.

३. वाहनाचे इंधन, दुरुस्ती, वाहनचालक यांचा वेतन व भत्ते यांचा संपूर्ण खर्च संबंधित वाहन मालकाने करणेचा आहे.

४. वाहन दररोज २४ तास जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाचे कामास, जि.प.आवारात उपलब्ध ठेवणे बंधनकारक राहिल.

५. वाहनाचे केंद्रीय मोटार वाहन अधिनियमानुसार आवश्यक ते रजिस्ट्रेशन(नोंदणी), सर्व कर, विमा, परवाने, वाहन सक्षमता प्रमाणपत्र (Fitness Certificate), प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (PUC), वाहनचालकाचा गणवेश याबाबतच्या नियमांचे पालन करण्याची जबाबदारी वाहन धारकाची असून याबाबतचे कोणतेही दायित्व अथवा जबाबदारी या कार्यालयाची, सातारा जिल्हा परिषदेची असणार नाही.

६. एकदा निश्चित केलेले दर कालावधी संपेपर्यत कोणत्याही कारणास्तव बदलण्यात येणार नाहीत.

७. भाडयाचा दर मंजूर झाल्यावर रुपये १०० चे स्टॅम्प पेपरवर अटी व शर्ती मान्य असलेबाबत करारनामा २ साक्षीदारांच्या स्वाक्षरीसह लिहून दयावा लागेल. तसेच अंदाजीत रक्कमेच्या ३% प्रमाणे सुरक्षा ठेव या कार्यालयाच्या बँक खाती भरणा करावी लागेल. वाहनधारकांची निवड होवून मंजूर दराने संबंधित वाहनधारकाने करारनाम्यानुसार काम

करणेस नकार दिल्यास अथवा वाहन सेवा पुरविणेचे कामात कुचराई केलेस त्याची सुरक्षा ठेव रक्कम जप्त केली जाईल व त्याचा समावेश काळया यादीत केला जाईल.

८. वाहन भाडयाने दिल्यानंतर सदर वाहनावरील इंधन, वंगण, दुरुस्ती, वाहन चालक यांचे वेतन, भत्ते इ. अदा करणेची जबाबदारी वाहन धारकाची राहील तसेच वाहनाच्या प्रवासाचे वेळी भरावा लागणारा टोल आकार, पार्कींग चार्जेस इत्यादी खर्च वाहन धारकाने त्या त्या वेळी स्वतः करणेचा आहे. टोल व पार्किंग चार्जेस यांच्या योग्य त्या खर्चाची प्रतीपुर्ती करणेचा अधिकार मा.मु.का.अ. यांचेकडे राखून ठेवणेत आला आहे.

९. कोणत्याही परिस्थितीत वाहन नादुरुस्त असल्यास अथवा वाहन चालक सेवा पुरविणेस असमर्थ असलेस त्याऐवजी पर्यायी व्यवस्था वाहनधारकाने विनाविलंब कोणताही जादा मोबदला न मागता करणेची आहे.

१०. यापुर्वी कामाचा अनुभव असल्यास व वाहन सातारा जिल्हा पासिंगचे असल्यास प्राधान्याने विचार करणेत येईल तथा फोटो प्रत पुरावा आवश्यक व लघुत्तम निविदा दर मंजूर होणे आवश्यक आहे.

११. सदरचे वाहन सातारा जिल्हा परिषद कार्यक्षेत्रात तसेच आवश्यकतेप्रमाणे पुणे, मुंबई आणि महाराष्ट्रात अथवा इतर कोठेही आवश्यकतेप्रमाणे नेले जाईल. त्याबाबत वाहनधारक अथवा वाहन चालकाची कोणतीही तक्रार असता कामा नये.

१२. वाहन पुरवठादाराकडून वाहन सेवेबद्दलचे देयकातून योग्य ते आयकर व सेवाकर विहित अधिनियमानुसार कपात करुन घेतले जाईल.

१३. या भाडयाने घेतलेल्या वाहनावर या अभियानाचे नाव, घोषवाक्ये व प्रचार, प्रसिध्दीसाठीच्या जाहिराती पक्क्या स्वरुपात सचित्र रंगविणे आवश्यक आहे.

१४. या वाहनाने केलेल्या प्रवासाच्या नोंदी व त्याबद्दलच्या संबंधितांच्या स्वाक्षऱ्या विहित नमुन्यातील लॉगबुकमध्ये वाहनचालकाने/ वाहनधारकाने नियमितपणे नोंदविण्याच्या आहेत.

१५.वाहन पुरवठादाराची सेवा वाढविण्याचा अथवा कमी करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवलेला आहे.

१६. फेर निविदेसाठी निविदाधारकास पुनःश्च निविदा फी व बयाणा रक्कम भरणे आवश्यक आहे.

१७. सदर निविदेच्या प्रक्रियेत कायदेशीर वाद , विवाद निर्माण झालेस त्याबाबतचे कार्यक्षेत्र हे सातारा जिल्हा न्यायालय राहील.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद सातारा